



# ‘शोलिंग फिशेस’ किंवा थव्याने राहणारे मासे

पाण्याशिवाय मासा राहणे शक्य नाही. पण काही मासे त्यांच्या जोडीदारांशिवायही राहू शकत नाहीत. ते नेहमीच एकत्र राहतात, एकत्र संचार करतात, एकत्र खातात. याला इंग्रजीमध्ये ‘शोलिंग हॅबिट’ असे म्हणतात. मराठीत त्याला आपण ‘थवाप्रवृत्ती’ असे म्हणू. दोन कारणामुळे मासे एकत्र येतात एक अन्न मिळविणे आणि दुसरे प्रजोत्पादन. काही मासे अगदी जन्मापासून मरेपर्यंत एकत्र राहतात. उदा. हेरिंग्ज, सारडाइन, ॲकोव्होज, मॅकरेल्स, स्प्रॅट्स वगैरे, ज्या वेळेला हे मासे संचार करत असतात त्यावेळी त्यांची रचना ठराविक असते एक मासा दुसऱ्या माशाला समांतर असतो आणि त्यांचे एकमेकापासून अंतरही सारखेच असते. शिस्तबध्द कवायतीसारखी त्यांची हालचाल असते. बहुतेक त्यांच्या ग्रुपमधली संख्या ही सारखीच असते. रुंदी, उंची, लांबी या तिन्ही मध्ये सुध्दा त्यांच्यात सारखेपणा असतो. लहान मोठे मासे असतील तर मोठे मासे तळाला राहतात व छोटे मासे वर राहतात. त्यामुळे सर्वांना सारखाच सूर्यप्रकाश मिळतो. अन्नाचा साठा खाताना ते वेगवेगळ्या रचना करतात. साठा खूप मोठा असेल तर काही मासे त्याच्या मागच्या बाजूला जातात व सर्वजण शिस्तबध्द पध्दतीने खातात. वाटेत येणारे अडथळे ते सफाईने टाळतात. पुढचे मासे ज्याबाजूने जातात त्यांचेच अनुकरण मागचे मासे करतात व अडथळा टाळतात. ज्यावेळी पाण्याचे तापमान थंड असेल त्यावेळी मासे त्यांच्यातले अंतर राखण्याच्या बाबतीत बदल करतात आणि एकमेकांना चिकटून राहतात व तळाकडे जातात व एकमेकांच्या शरीराची ऊब घेऊन थंडी टाळतात. हे मासे असे का करतात याच्या मागचे प्रमुख कारण म्हणजे एकमेकांबद्दलचे त्यांचे आकर्षण. माशांचे डोळे आणि नाक हे या एकत्र राहणाऱ्या प्रवृत्तीचे कारण आहे. एकमेकांच्या दृष्टीपथात राहाणे व विशिष्ट गंध असणाऱ्या माशांच्या बरोबर राहणे त्यामुळेच घडते. एका भांड्यात एकच मासा सोडला तर तो तडफडून मरेल पण त्याबरोबर दुसरा असेल तर दोघं आनंदात राहतात. पण हेही आपण बघतो की काही मासे सुटे सुटेही राहतात. या माशांच्या राहण्याच्या वेगवेगळ्या पध्दतींचा अभ्यास अजूनही पूर्णत्वाने झाला नाही.

◆

**सतीश कुलकर्णी**